# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती "आय" (वसई)

वडवली मार्केट

बाजार विभाग

द्वितीय फेर दरपत्रक

सन- २०२१-२२-२३-२४

विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" वसई (प.) अंतर्गत येणाया वडवली बाजार कर वसुली करणे कामी दरपत्रक मागविण्याबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका

Deckstop/Gojare sir/Tender Market1

Scanned with CamScanner

# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती "आय" (वसई)

## द्वितीय फेर दरपत्रक

**कामाचे नाव:-** दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" (वसई) अंतर्गत वडवली मार्केट फी वसुली करिता ठेका पध्दतीने देणेबाबत.

दरपत्रक/पुरवठा धारकाचे पुर्ण नाव :- ----------------------------------------

संपूर्ण पत्ता (पिन कोडसह) :- ----------------------------------------

----------------------------------------

दुरध्वनी क्रमांक :- कार्यालय:- ----------------------------------------

:- मोबाईल:- ----------------------------------------

(परिशिष्ट-अ)

| कामाचे नाव | किमान देकार रक्कम रुपये | अभिकर्ताने नमुद करावयाचे रक्कम |
|---|---|---|
| <u>सन-२०२१-२२-२३-२४</u><br>(दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४) या ३ वर्षकालावधी करिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" (वसई) अंतर्गत येणा-या वडवली मार्केट येथील फी वसुली ठेका पध्दतीने देणे बाबत. | २०२१-२२:- ७६,३५८/-<br>२०२२-२३:- ८३,९९३/-<br>२०२३-२४:- ९२,३९२/-<br>अपेक्षित रक्कम रुपये एकुण-<br>२,५२,७४३/- | रक्कम रुपये (अंकात)--------------<br>रक्कम रुपये (अक्षरी)--------------<br>----------------------------------<br>----------------------------------<br>------------------ |

पॅनकार्ड, आधारकार्ड, जी.एस.टी.प्रमाणपत्र साक्षांकित केलेले प्रत जोडणे बंधनकारक आहे.

दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदाराची
तारखेसहीत सही व शिक्का

Deckstop/Gojare sir/Tender Market2

Scanned with CamScanner

# अटी व शर्ती

१) विहीत नमुन्यात भरलेली दरपत्रके आधारकार्ड, पॅनकार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र सिलबंद लखोटयामध्ये दि२८/०९/२०२१ रोजी दु. ३.०० वाजेपर्यत प्रभाग समिती - आय येथे सिलबंद पेटीत टाकावी. मूदती नंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यांत येणार नाही.

२) सदरील दरपत्रके दि.२४/०९/२०२१ ते दि२४/०९/२०२१ दु. ३.०० वाजेपर्यत स्विकारणेत येतील.

अ) किमान देकार रक्कम -

१. ठेकेदाराने दरपत्रके भरताना लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा लिफाफ्यात रक्कम /दर नमुद करावेत.

२. जास्त दराच दरपत्रक स्विकारल्यानंतर एकुण देकार रक्कम ४ टप्यात महानगरपालिका फंडात जमा करावयाचे असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१.एकुण देकार रक्कमेच्या २५% रक्कम दरपत्रक स्विकारल्याच्या दिनांकापासुन १० दिवसात महानगरपालिका फंडात धनाकर्षाद्वारे / आर.टी.जी.एस./ एन.इ.एफ.टी.द्वारे जमा करावयाची आहे.

२.तद्नंतर २५% रक्कम माहे ऑक्टोंबर २०२१ मध्ये जमा करावयाची आहे.

३.तसेच २५% रक्कम माहे जुन २०२२ मध्ये जमा करावयाची आहे.

४.उर्वरीत २५% रक्कम माहे मार्च २०२३ मध्ये मनपा फंडांत जमा करावयाची आहे.

१. प्रभाग समिती हद्दीत नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार बंद झाल्यास महानगरपालिकेकडून नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बसणाया फेरीवाल्यांाा अतिक्रमण विभागाकडून उठविण्यात येईल. अभिकर्त्यास त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

३. बाजार फी वसुली महानगरपालिकेने ठरवूा दिलेल्या दरानुसार करावयाचे आहे. (दराची माहीती संबंधित प्रभागांच्या सहा.आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध असेल.) निश्चित करुन दिलेल्या दरापेक्षा जादा दराने वसुली केल्यास अगर तशा आशयाची तक्रार आल्यास ठेका रद्द करण्यात येईल, व आपली किमान देकार रक्कम जप्त करण्यात येईल. यामुळे होणाया आर्थिक नुकसानीस अभिकर्ता जबाबदार राहील.

४. दैनंदिन बाजार वसुलीसाठी लागणारी पावती पुस्तके ठेकेदारास स्वखर्चाने छपाई करुन पावती पुस्तके महानगरपालिका बाजार विभागामार्फत प्रमाणित करुन घ्यावी लागेल व त्याचाच वापर करावा लागेल.

५. ज्या ठेकेदारास दरपत्रक मंजुर होईल अशा मंजुर दरपत्रक धारकाने जाहीर दरपत्रक सुचनेत नमुद केले प्रमाणे पुर्ण रक्कम डिमांड ड्राफ्टने जमा करुन करारनाम्यासाठी आवश्यक रक्कमेचे स्टॅम्प पेपर कार्यालयात जमा करुन करारनामा करुन घ्यावा.

६. बाजार शुल्क वसुली करताना नागरीकांशी, व्यापा-यांशी सौजन्याने वागावे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. दरपत्रक अटी शर्तीप्रमाणे व मंजुर दाराप्रमाणे काम करण्यास नकार दिला व कामात काही वाद विवाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील, व त्याचे अनुपालन करण्याचे ठेकेदारावर बंधनकारक राहील. या विरुध्द दाद मागत येणार नाही.

८. वसुलीच्या कामाच्या तपासणीचे अधिकार महानगरपालिकेचे आयुक्त, उप. आयुक्त, सहा आयुक्त हयांना राहील.

९. अभिकर्त्यास वसुलीकामी नेमणूक केलेल्या व्यक्तीच्या ाावाची यादी महानगरपालिकेस देणेबंधनकारक आहे. व वसूली करणायाचे ओळखपत्र सहा.आयुक्त यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

Deckstop/Gojare sir/Tender Market3

Scanned with CamScanner

१०. दरपत्रक धारकाो त्या वर्षाच्या कालावधीत ठेक्याची वसुली करावी लागेल. सदरचा ठेका परस्पर दुसयास हस्तांतर करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद् करण्यात येईल.

११. महानगरपालिकेच्या अटी शर्ती आपणांवर बंधनकारक राहतील व इतर कायद्यातील तरतुदी आपणांवर बंधनकारक राहतील.

१२. सदरील कामाकरिता महानगरपालिका आपणांस कोणतेही मनुष्यबळ, यंत्र, अवजारे, वाहा देणार नाहीत. आवश्यकतेनुसार स्वत:चे साहीत्य व माुष्यबळ वापरुा सेवा पूर्णपणे उपलब्ध करावयाची आहे.

१३. दरपत्रकेच्या वैध कालावधीमध्ये महानरपालिकेच्या संमती शिवाय दरपत्रक धारकास त्याची दरपत्रक रद्द करता येणार नाही. तथापि तशी परिस्थिती उद्भवल्यास पुर्वग्रह दुषित शिवाय महानगरपालिका ठेकेदाराची किमान देकार रक्कम जप्त करेल व ठेकेदारास दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

१४. जी. एस. टी. भरण्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१५. कोणत्याही ठिकाणी नविन फेरीवाले बसविण्यास प्रोत्साहित करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

१६. कुठलाही देकार स्विकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा राहील.

१७. अंपग असल्यास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक

१८. रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१९. वरील सर्व अटी व शर्तीत बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना असतील.

अ) पॅनकार्ड

ब) आधारकार्ड

क) जी. एस. टी. प्रमाणपत्र

ड) दर अंकात व अक्षरात रुपयामध्ये नमुद करावेत.

२०. वरील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आपणांस बंधनकारक असेल अन्यथा ठेका रद्द करण्यात येईल.

उप-आयुक्त (दै.बाजार फी)
वसई-विरार शहर महानगरपालिका

Deckstop/Gojare sir/Tender Market4

Scanned with CamScanner